'आमची खोड काढाल तर तुमचे दात घशात घातल्याशिवाय राहणार नाही...'

११ जुलै : टोलविरोधी 'रास्ता रोको' – प्रशांत ठाकूर

पनवेल : रामप्रहर वृत्त

'आम्ही सत्ताधारी पक्षात असलो, तरी जनतेच्या प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी कधीही कच खाल्लेली नाही आणि खाणारही नाही. जनतेच्या प्रश्नासाठी खारघरच्या टोलनाक्याविरुद्ध स्थानिकांना टोलमधून सूट मिळेपर्यंत रस्त्यावर उतरल्याशिवाय राहाणार नाही. प्रशांत ठाकूर या आंदोलनामध्ये आघाडीवर असेल. शे. का. पक्षवाले खारघरच्या टोलनाक्याबद्दल मूग गिळून बसले आहेत. कोणीही शे. का. पक्षवाला टोलविरुद्ध एक शब्द बोलायला तयार नाही आणि आम्हाला आव्हाने देत आहेत. आम्ही शांततामय मार्गाने स्थानिकांना टोलमधून सूट मिळण्यासाठी मुख्यमंत्री, सरकारी पातळीवर सर्व प्रयत्न करीत आहोत. त्यात नक्की यश येईल, पण जर टोल रद्द झाला नाही, तर रस्त्यावर उतरल्याशिवाय राहाणार नाही, टोल रद्द करून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. शेकापवाल्यांना स्पष्टपणे सांगतो आहे की, आमची खोड काढू नका आणि जर खूमखुमी असेल आणि आमची खोड काढलीत तर तुमचे दात घशात घातल्याशिवाय राहाणार नाही,' इतक्या आक्रमक शब्दांत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज शे. का. पक्ष आणि त्यांच्या बगलबच्च्यांवर जाहीरपणे हल्लाबोल केला.

आजच्या या टोलनाका आंदोलन बैठकीला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सभागृह अपुरे पडले. सभागृहाच्या बाहेर व्हरांड्यामध्ये २०० कार्यकर्त्यांसाठी खुर्च्या टाकाव्या लागल्या. शेवटी खुर्च्याही कमी पडल्या आणि शेकडो कार्यकर्त्यांना दोन–अडीच तास उभे राहूनच या बैठकीत सहभागी व्हावे लागले.

शेकडो तरुणांना उभे राहावे लागल्यामुळे रामशेठ ठाकूर यांनी मोजकी भाषणे ठेवली आणि पहिले तडाखेबंद भाषण आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. खारघर येथे बसविलेल्या टोलनाक्याचा सर्व तपशील त्यांनी सांगितला. टोलनाक्याला आमचा विरोध नाही, पण महाराष्ट्रात सुद्धा अनेक टोलनाक्यातून स्थानिक नागरिकांना सूट दिलेली आहे. खारघरनजीक काही ठिकाणी सहापदरी, काही ठिकाणी दहापदरी रस्ता झाला तो आमच्या काँग्रेस सरकारनेच केलेला आहे, पण या परिसरातील छोट्या–मोठ्या व्यावसायिकांना दिवसातून दोन–चार वेळाही वाशी किंवा मुंबईला जावे–यावे लागते. त्यांना हा टोलचा भुर्दंड कशाकरिता? पनवेलपासून सायनपर्यंत रस्त्याचे रुंदीकरण केल्यानंतर पनवेल तालुक्यातील वाहनांकरिता पर्यायी सेवा रस्ता देण्याचे काम संबंधित विभागाने करायला हवे होते, पण त्यांनी तसे केले नाही. मग स्थानिकांनी टोलचा भुर्दंड का भरावा? शेकापने टोलला विरोध का केला नाही? सर्व पक्षांनी टोलला विरोध केला, पण शेकापचा कुणीही टोलमधून सवलत मागायला पुढे आलेला नाही. शेकाप जनतेच्या बाजूने आहे की टोलनाकावाल्यांच्या बाजूने. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना दमदाटीची भाषा आता शेकाप करीत आहेत. कुणी केणी नावाच्या शेकाप कार्यकर्त्याने टोलविरोधात प्रचार करणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्याला धमकी देण्याचा प्रयत्न केला. आमच्या कार्यकर्त्याला हात लावून बघा, गेल्या निवडणुकीची आठवण ठेवा. शेकापच्या दहशतीला न घाबरता जशास तसे उत्तर देऊ, असेही त्यांनी सांगितले.

माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत या टोलचा विषय मी घेऊन गेलो. त्यांना तसे पत्र दिले. त्यानंतर रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस अध्यक्ष आर. सी. घरत यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले, मुख्यमंत्र्यांना तपशील समजावून सांगितला. त्यांना विषय पटला आहे. त्यांनी संबंधितांची बैठक बोलाविण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार ते निर्णय करतील याचा विश्वास आहे, पण निर्णय झाला नाही, तर आमचं सरकार असले तरी हा विषय आम्ही सोडून देणार नाही, ११ जुलै रोजी 'रास्ता रोको' होणारच, अशी ठाम घोषणा करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विवेक पाटील आणि शेकापच्या नेत्यांची सालटी काढली. तो कोण राजेंद्र पाटील? असा सवाल करून ते म्हणाले की, डुक्कर या प्राण्याची सवय जिथे–तिथे घाण करण्याची असते. राजेंद्र पाटील ही अवलाद तसलीच आहे. तो आम्हाला आव्हान देतो आहे 'टोल रद्द करून दाखवा'. या शेकापवाल्यांपैकी ना विवेक पाटील ना बाळाराम पाटील कोणीही टोलच्या विरोधात बोलत नाही. टोलचा कॉन्ट्रॅक्टर आणि यांचे सर्व काही ठरलेले आहे. आता या महागाईविरुद्ध तरी कुठे बोलताय. रेल्वे पास वाढला, रेल्वे तिकीट वाढले, पेट्रोल–डिझेल, गॅस सिलिंडर वाढला. काँग्रेस सरकारच्या काळात जेव्हा वाढ होत

होती तेव्हा हे भाजपवाले आणि शेकापवाले काय काय बोलत होते. आज आता या सगळ्यांना मुकेपण, बहिरेपण आलेले आहे. भाववाढीच्या विरोधात आम्ही रस्त्यावर उतरलो. उद्या ६ तारखेलाही रस्त्यावर उतरून पेट्रोल दरवाढीचा निषेध करणार आहोत आणि सामान्य माणसांबरोबर उभे राहाणार आहोत. ११ तारखेला हजारो लोक जेव्हा 'रस्ता रोको' करतील तेव्हा स्थानिकांना टोलवाढीतून सूट द्यावीच लागेल (प्रचंड टाळ्या).

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात बदलत्या पनवेलचे स्वरूप विशद केले. काही जण नवीन पनवेल आणि जुने पनवेल अशी तुलना करून बोलतात. परवा माझ्याकडे एक माणूस आला, त्याला विचारले कुठे राहतोस? तो म्हणाला, 'जुन्या पनवेलमध्ये' मी म्हटले अरे जुने पनवेल का म्हणतोस, तो म्हणाला 'नवीन पनवेलसारखे जुने पनवेल वाटत नाही' सामान्य माणसांची ही जी भावना झाली आहे त्यासाठीच मी हा निर्धार केला आहे की आता कोणीही 'जुने पनवेल' असा शब्दप्रयोग करणार नाही. जुने पनवेल नव्या पनवेलइतकेच दर्जेदार होईल. त्यासाठीच तर मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएच्या बैठकीत १६१ कोटी रुपयांचा विशेष निधी पनवेलकरिता दिला आहे. मुख्यमंत्र्यांचे आभार मानणारा प्रस्ताव मी याच ठिकाणी मांडतो आणि तो टाळ्यांच्या गजरात मंजूर करा (टाळ्यांच्या गजरात मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर होतो). हे जे १६१ कोटी रुपये मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत त्यातून पाच काँक्रीटचे रस्ते आपण करणार आहोत. विलासराव देशमुख यांनी दिलेल्या उड्डाणपुलाचे एक्स्टेन्शन करून पंचमुखी मारुतीपासून पुलाचे रुंदीकरण होईल. नावड्याचा उड्डाणपूल होणार आहे. हा सगळा विकास पनवेलचे चित्र बदलण्याकरिता आहे. शेकापवाल्यांनी त्यासाठी काय केले याचा हिशेब द्यावा.

जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. आर. सी. घरत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'पनवेलसाठी १६१ कोटी रुपये देणाऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा अभिनंदनाचा ठराव आपण मंजूर केला, पण हे १६१ कोटी रुपये पनवेलसाठी आणणाऱ्या आमदार प्रशांत ठाकूर यांचेही अभिनंदन करणारा ठराव मंजूर करायला पाहिजे.' हा ठराव श्री. घरत यांनीच मांडला आणि तोही टाळ्यांच्या गजरात मंजूर झाला.

या बैठकीस जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष जी. आर. पाटील, ज्येष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, नगराध्यक्षा चारुशीला घरत, शिक्षण मंडळाचे सभापती वाय. टी. देशमुख, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, चिटणीस व प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, महिला तालुकाध्यक्षा ॲड. आशा भगत, कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहराध्यक्षा वर्षा नाईक, कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, पनपचे शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बालकल्याण सभापती नीता माळी, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, युवा नेते परेश ठाकूर, मावळ लोकसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, पंचायत समिती सदस्य नीलेश पाटील, पनवेल विधानसभा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, युवक तालुकाध्यक्ष अमर पाटील, एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, के. ए. म्हात्रे, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रकाश बिनेदार, नगरसेविका सीता पाटील, कल्पना ठाकूर, संगीता कांडपाल, नाझ हाफीज, मंगला राणे, कामोठे अध्यक्ष गोपीनाथ गोवारी, कार्याध्यक्ष सुधाकर पाटील, खारघर शहर अध्यक्ष अनंता तोडेकर, विभागीय अध्यक्ष बुधाजी ठाकूर, अध्यक्ष कुमार नाईक, शिवाजी दुर्गे, वसंत काठावले, ग्राहक हित कक्षच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, माजी नगरसेवक सिराज सय्यद, यांच्यासह पुरुष, महिला व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. प्रशांत ठाकूर यांच्या आक्रमक भाषणाचे जोरदार स्वागत

पनवेल शहर आणि तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने बोलाविण्यात आलेल्या आजच्या या सभेमध्ये हजार तरुणांनी गर्दी करून प्रशांत ठाकूर यांच्या आक्रमक भाषणाला टाळ्यांच्या कडकडाटासह जोरदार दाद दिली. अतिशय आक्रमक भाषण करून प्रशांत ठाकूर यांनी आता दंड थोपटले आहेत आणि ते मैदानात उतरले आहेत याचा आनंद तरुणांनी उत्स्फूर्तपणे व्यक्त केला. तशी भावना अनेक तरुणांनी प्रशांत ठाकूर यांच्या भाषणानंतर त्यांना भेटून व्यक्त केली.